

# ‘टीसीएस आयटी विझ’ स्पर्धेत सेंटर पॉईंट स्कूल विजयी

## अंतिम फेरीत करणार शहराचे प्रतिनिधित्व

**नागपूर.** देशातील अग्रणी कन्सल्टन्सी व बिजनेस सोल्युशन्स कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) तर्फे आयोजित भारतातील सर्वात मोठी आंतर-शालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा, टीसीएस आयटी विझच्या नागपूर, प्रादेशिक फेरीत नागपूर भिलाई, रायपूर आणि दुर्गच्या विविध शाळांच्या नऊशेच्या वर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या स्पर्धेचे आयोजन मंगळवारी वसंतराव देशपांडे सभागृह, सिव्हील ल्र्वईन्स येथे करण्यात आले. इयत्ता 8 वी ते 12 वीच्या विद्यार्थ्यांसाठी ही निःशुल्क स्पर्धा आयोजित करण्यात येते. दोन विद्यार्थी असलेल्या 8 चमूंपर्यंत एका शाळेतून विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. यावर्षीच्या स्पर्धेची संकल्पना ऑटोमेशन, संदर्भ ज्ञान, मशीन शिक्षण आणि चपळता ही होती.

जागतिक स्तरावरील तंत्रज्ञानातील वेगवेगळया पैलूंवर या प्रश्नमंजूषेद्वारे प्रकाश टाकल्या जातो. प्रश्नमंजूषेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या ज्ञानाचा त्यांच्या भविष्यात फायदा होईल. लेखी प्राथमिक फेरीद्वारे प्रादेशिक अंतिम फेरीसाठी सहा टीमची निवड करण्यात आली.

प्रादेशिक अंतिम फेरीतील प्रश्नमंजुषेच्या पाच फेरीनंतर सेंटर पॉईंट स्कूल, वर्धमान नगरच्या अर्चित वेणूगोपालन व संचित खेडकर या विद्यार्थ्यांनी स्पर्धा जिंकली. यासोबतच अंतिम फेरीतील सर्व 6 स्पर्धकांना टीसीएसतर्फे जीम बॅग, ओटीजी,पेनड्राइव्ह, इअरफोन्स, ब्लूटूथ स्पिकर्स असे आकर्षक बक्षीस देण्यात आले. राष्ट्रीय अंतिम फेरीत भाग घेण्यासाठी विजेत्या टीमला एक शिक्षक/पाल कासोबत विमानाद्वारे मुंबईला रवाना करण्यात येईल.